

रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.



मराठी विभाग सन २०२२-२३

दि.२७ फेब्रुवारी २०२३

## मराठी भाषा गौरव दिन

## अहवाल

महाविद्यालयातील मराठी विभाग आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर. यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून राजाराम महाविद्यालय कोल्हापूर येथील सहा.प्राध्यापक डॉ.विजया वाडकर या उपस्थित होत्या. त्यांनी 'मराठी भाषा जतन आणि संवर्धन' याविषयावर व्याख्यान दिले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, "कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्रच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले, त्यांनी अनेक दर्जेदार पुस्तके लिहिली आहेत. मराठी साहित्याचे क्षेत्र समृद्ध करण्यात कुसुमाग्रज यांचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यांचा जन्मदिवस आपण मराठी भाषा गौरव दिन म्हणून सर्वत्र साजरा करतो. आपण आपल्या मातृभाषाचे संवर्धन करण्याचा नेहमी प्रयत्न केला पाहिजे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा." कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागातील प्राध्यापक श्रीमती.सायरा मुलाणी या होत्या. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्या म्हणाल्या की, "विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण हे त्याच्या मातृभाषेतून दिले पाहिजे. मातृभाषेतून शिकताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. मराठी भाषेमधील अनेक पुस्तके आपल्या जीवनाला योग्य दिशा देणारी आहेत. त्याचा शोध प्रत्येकांनी घ्यावा." कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मराठी विभागातील सहा.प्राध्यापक डॉ.महेश रणदिवे केले. सूत्रसंचालन श्रीमती.सविता माजगावकर यांनी केले तर आभार प्रा.अंकुश घुले यांनी मानले. कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.कदम, उपप्राचार्या प्रा.डॉ.सिंधू आवळे यांनी मार्गदर्शन केले.

### परिणाम/निष्पती

- विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरव दिनाची माहिती मिळाली.
- विद्यार्थ्यांना कवी कुसुमाग्रज यांच्याविषयी माहिती मिळाली.
- विद्यार्थ्यांना मराठी भाषा व साहित्याविषयी ज्ञानात भर पडली.

**लाभार्थी**

५७







प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज
कोल्हापूर

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर.